जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव
फोन ०२५७-२२२१७९० फॅक्स ०२५७-२२२०५११
Email ID:-sp.jalgaon@mahapolice.gov.in

## -:प्रेस नोट :-

दिनांक :- २२/०५/२०२६

# " दोन वर्षांपासून पाहिजे असलेला खुनाचा प्रयत्न व घर जाळणारा आरोपी जळगाव स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळ्यात "

**जळगाव शहरात सन २०२४ मध्ये झालेल्या जुन्यावादातून खुनाचा प्रयत्न करणे आणि घर पेटवून देण्याच्या दोन वेगवेगळ्या गुन्ह्यांमध्ये तब्बल दोन वर्षांपासून पोलिसांना हुलकावणी देणारा फरार मुख्य आरोपी विशाल अजय सुरवाडे (वय ३०, रा. राजमालती नगर, दूध फेडरेशनजवळ, जळगाव) याला स्थानिक गुन्हे शाखेच्या (LCB) पथकाने २० मे २०२६ रोजी अत्यंत शिताफीने जळगावातूनच जेरबंद केले आहे.**

माहे नोव्हेंबर २०२४ मध्ये जळगाव येथील सुरत रेल्वे गेटजवळ जुन्या वादातुन मोठ्या भांडण झाले होते. राजमालती नगरमधील १२ ते १३ जणांच्या टोळक्याने रेहान उर्फ जानू संजू पटेल यास बेदम मारहाण करत जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला होता. याप्रकरणी राजू बिस्मिल्ला पटेल यांच्या फिर्यादीवरून जळगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा गु.र.नं. ५१३/२०२४, भा.न्या.सं. कलम १०९, १९१(२), ११८(२), ३५२, ३५१(३) प्रमाणे दाखल करण्यात आला होता.

आरोपी विशाल सुरवाडे याचा नातेवाईक सिद्धार्थ वानखेडे याचा झालेल्या भांडणात मृत्यू झाल्याचा राग मनात धरून, विशाल आणि त्याच्या साथीदारांनी राजू पटेल यांच्या राजमालती नगरमधील घरावर हल्ला चढवला. त्यांनी घराची प्रचंड तोडफोड केली आणि साहित्याला आग लावून अख्खे घर जाळण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी नाजमा परवीन राजू पटेल यांच्या फिर्यादीवरून जळगाव शहर पोलीस ठाण्यात आणखी एक गुन्हा गु.र.नं. ५१९/२०२४, भा.न्या.सं. कलम १२६ प्रमाणे दाखल करण्यात आला होता.

या दोन्ही गंभीर गुन्ह्यांमधील इतर आरोपींना पोलिसांनी आधीच अटक केली होती. मात्र, मुख्य संशयित **आरोपी विशाल सुरवाडे** हा गुन्हा घडल्यापासूनच जळगावातून फरार झाला होता. पोलीस त्याचा सातत्याने शोध घेत होते, परंतु तो वारंवार आपली ठिकाणे बदलून पोलिसांना चकमा देत होता.

दिनांक २० मे २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल गायकवाड यांना गोपनीय व तांत्रिक माहिती मिळाली की, फरार आरोपी विशाल सुरवाडे हा जळगाव शहरात आला आहे. खात्रीशिर माहितीचे आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तातडीने सापळा रचून **राजमालती नगर, दूध फेडरेशन परिसराबाहेरून आरोपी विशाल सुरवाडे यांस** अत्यंत शिताफीने ताब्यात घेतले. पुढील कायदेशीर कारवाईसाठी आरोपीला जळगाव शहर पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.

**सदरची कार्यवाही कामगिरी पोलीस अधीक्षक श्री. श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक, श्री. संदीप गावीत, आणि उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. नितीन गुणापुरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल गायकवाड यांचे नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक शरद बागल, सहाय्यक फौजदार अतुल वंजारी, पोलीस हेकॉ. विजय पाटील, अक्रम शेख, नितीन बाविस्कर, मुरलीधर धनगर, प्रवीण भालेराव, पोलीस अंमलदार रवींद्र कापडणे आणि सिद्धेश्वर डापकर या पथकाने उत्कृष्ट व उल्लेखनीय कामगिरी केली आहे.**

**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, जळगांव**


स्थानिक गुन्हे शाखा
रेकॉर्ड रुम
रेकॉर्ड रुम